# प्रधान मंत्री पीक विमा योजना

कृषि विभाग
महाराष्ट्र शासन

**भारत सरकार आणि कृषि विभाग-महाराष्ट्र शासन**

Pradhan Mantri
Fasal Bima Yojana

## पीक विमा मोबाईल ॲप

### पीक विमा मोबाईल ॲपचे अंमलबजावणीतील महत्व

प्रधान मंत्री पीक विमा योजना अंतर्गत शेतक-यांना विविध सेवांचा लाभ घेता यावा यासाठी भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने एक अतिशय सोपे, शेतक-यांना उपयुक्त आणि व्यापक असे मोबाईल ॲप तयार केले आहे. या ॲपव्दारे पीक नुकसानीची माहिती नोंदविण्या करीता प्राधान्य देण्यात आलेले असून हे मुख्य स्त्रोत घोषित केले आहे. **ॲपव्दारे नोंदणी केल्यानंतर कुठल्याही कागदपत्रांची गरज भासणार नाही.** हे ॲप तीन भाषांमध्ये उपलब्ध आहे. यामध्ये मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषा उपलब्ध आहेत.




### ॲपव्दारे उपलब्ध सेवा

1. पीक नुकसान पूर्व सुचना.
2. विमा हप्ता निश्चिती.
3. शेतक-यांचे योजनेसंबंधी प्रश्न आणि मदत केंद्र.

### ॲप कसे वापरावे

हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. हे ॲप डाउनलोड करण्यासाठी आणि कार्यान्वित करण्यासाठी शेतक-यांना गुगल प्ले स्टोअरवर “Crop Insurance App” शोधण्याची आवश्यकता आहे. एकदा इंस्टॉलेशन पूर्ण झाल्यानंतर, उपलब्ध केलेल्या विविध सेवांचा लाभ घेण्यासाठी ॲप उघडले जाऊ शकते. ॲप खालील लिंकचा वापर करून डाउनलोड देखील करता येईल :
https://play.google.com/store/apps/details?id=in.farmguide.farmerapp.central

### ॲपद्वारे पीक नुकसानाची माहिती कशी द्यावी

वैयक्तिक शेतकरी खाली दिलेल्या सुचनांच्या आधारे पीक विमा ॲपद्वारे विविध जोखिमेमुळे झालेल्या पीक नुकसानाची माहिती वापरु शकतात :

1. शेतकरी त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल नंबर आणि संकेत शब्दाद्वारे (Password) ॲपवर लॉग इन करु शकतात किंवा ॲपच्या मुख्य पृष्ठावरील उपलब्ध “ लॉगिन शिवाय पुढे जा ” हा टॅब निवडून लॉगिन शिवाय ही सुविधा घेऊ शकतात.
2. पुढील पृष्ठामध्ये शेतकरी/ वापरकर्त्याने पीक नुकसानीचे माहिती हा टॅब निवडल्यानंतर ओ.टी.पी. मिळविण्यासाठी मोबाइल नंबर नमूद करणे आवश्यक आहे.
3. एकदा ओ.टी.पी. प्राप्त झाला आणि यशस्वीरित्या नमूद केल्यानंतर शेतक-यांना हंगाम - वर्ष - योजना - राज्य इत्यादी तपशील नमूद करणे आवश्यक आहे.



4. पुढील पृष्ठामध्ये शेतकरी पुढे जाण्यासाठी अर्जाचा स्त्रोत आणि अर्जाचा क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
5. एकदा शेतकरी पुढील पृष्ठावर गेल्यानंतर, पॉलिसी तपशील तयार होतील व नुकसान भरपाईची नोंद करण्यासाठी बाधीत पीक निवडणे आवश्यक आहे.
6. पुढील पृष्ठामध्ये, नुकसानीचा प्रकार, नुकसानीची तारीख, शेरा नमूद करणे आवश्यक आहे. बाधीत क्षेत्राचे फोटो अपलोड करणे आवश्यक आहे. एकदा तपशील यशस्वीरित्या नमूद केल्यानंतर शेतकरी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सबमिट बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे.
7. एकदा तपशील यशस्वीरित्या सबमिट केल्यावर, यशस्वी सबमिशनचे पुष्टीकरण आणि भविष्यातील संदर्भासाठी एक डॉकेट नंबर स्क्रीनवर उपलब्ध होईल.



















कृपया लक्षात घ्या - जर शेतकऱ्याकडे अर्ज क्रमांक नसेल तर त्याने पॉलिसी तपशील पृष्ठावरील " इतर पर्याय निवडा " वर क्लिक करावे आणि आवश्यकतेनुसार वैयक्तिक, बँक, पीक आणि जमीन तपशील द्यावा.

## पीक विमा मोबाईल ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत

- ॲपवर पीक नुकसान माहिती/पूर्वसुचना नोंदविण्याची ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे.
- पीक नुकसानीची पूर्वसुचना कागदपत्राशिवाय **ऑनलाईन** पद्धतीने तात्काळ नोंदविता येते.
- पूर्व सुचना नोंदविण्याकरीता केंद्र शासनाने या पीक विमा मोबाईल ॲपला प्रथम प्राधान्य दिलेले आहे.
- ॲपमुळे शेतक-यांना पूर्व सुचना नोंदवितांना कुठल्याही कागदपत्रांची गरज भासणार नाही.
- पूर्वसुचना मराठी भाषेतून नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे.
- झालेल्या पीक नुकसानीचा फोटो/व्हीडीओ अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे.
- पूर्वसुचना नोंदविल्यानंतर पूर्वसुचना क्रमाक प्राप्त होतो.
- ॲपवर विमा प्रिमियमच्या गणनेबाबत सुविधा उपलब्ध आहे.
- ॲपवर शेतक-यांना योजनेबाबतच्या अडीअडचणी बाबतची माहिती मिळून शंका- समाधान होण्याची सुविधा उपलब्ध आहे.